असतो मा सद् गमय ।
तमसो मा ज्योतिर्गमय ।।

# Sandip Foundation's
## Sandip Institute of Technology & Research Centre
## Department of NSS
A/P : Mahiravani-422213, Tal & Dist: Nashik
Website : http://www.sandipfoundation.org Email : principal@sitrc.org
Tel. (02594) 222 551-54, Fax: (02594) 222 555

### Swachha Bharat Abhiyan

**Agenda of event (schedule/format): Swachha Bharat Abhiyan**

**Date:**2nd October 2015.

**Time:** 10.30 am to 2 pm

**Venue:** At village Belgaon Dhaga Tal- Nashik, District- Nashik

**Summary of Program:**
1. In Swachha Bharat Abhiyan NSS volunteers clean the village Belgaon Dhaga.
2. The members of Panchayat also worked with the NSS team.
3. The volunteers separated the plastic waste.
4. The message of importance of the cleanliness was given to villagers

**No of volunteers participated:** 70

## Photographs of the Event:




**The Team of Swachata Abhiyan**











**Volunteers involved in Swachata Abhiyan**



सुखद सोमवार

संदीप फाउंडेशनच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी केली सलग तीन वर्षे रासेयोतून विकासकामे, लोकांच्या सहभागातून गावाने साधला विकास

# अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे श्रमदान, गावाने पटकावला 'निर्मलग्राम'

गणेश डेमसे | नाशिक

त्र्यंबकेश्वरजवळील बेळगाव ढगा गावाला 'निर्मलग्राम' पुरस्कार जाहीर झाला असून, संदीप फाउंडेशनच्या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांनी सलग तीन वर्षे केलेले श्रमदान व लोकसहभागाचा त्यात मोठा वाटा आहे. शौचालयांअभावी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांसंदर्भात घरोघरी महिलांसह ग्रामस्थांचे प्रबोधन करत सांडपाणी व्यवस्थापन करण्यासाठी शोषखड्डे करून विद्यार्थ्यांनी सलग तीन वर्षे स्वच्छतेचा जागर केला.

रस्तासुरक्षा, वृक्ष लागवडीद्वारे पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन प्रबोधन, सांडपाणी व्यवस्थापनाचे प्रयोगही यशस्वीपणे राबविले आहेत.

संदीप फाउंडेशनच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत रॅली काढली.

अभियांत्रिकीच्या१००विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातील सुमारे ४२२ कुटुंबांचे सर्वेक्षण करून ग्रामस्थांना कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत, याचा अहवाल तयार केला. त्यानुसार स्वच्छतेबाबत ग्रामस्थांमध्ये फारशी जागृती नसल्याचे समोर आल्याने विद्यार्थ्यांनी प्रारंभी घरोघरी प्रबोधन केले. ग्रामपंचायतीच्या सहकार्याने गावात ठिकठिकाणी शोषखड्डे तयार केले. ग्रामपंचायतीनेही शौचालये बांधून गाव निर्मल करण्याचा प्रयत्न केला. तीन वर्षांपासून विद्यार्थ्यांनी केलेल्या विकासकामांचा हातभार लाभल्याने शासनाचा गेल्या वर्षीचा निर्मलग्राम पुरस्कार जाहीर झाला, ग्रामपंचायतीला लवकरच तो प्रदान केला जाणार आहे.

## लोकसहभागातून अवतरली विकासगंगा

- १०० टक्के शौचालयांची निर्मिती.
- कचरा संकलनासाठी लोकसहभागातून घंटागाडी.
- शुद्ध पाण्यासाठी फिल्टर प्लांट.
- सेंद्रिय खतनिर्मिती प्रयोग.
- दलित वस्ती योजनेंतर्गत रस्त्यांची सुधारणा.
- दोन क्रीडांगणांचा विकास.
- वृक्ष लागवडीद्वारे पर्यावरण संवर्धन उपक्रम

## मोलाचा वाटा

ग्रामविकासाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. संदीप फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी सात दिवस गावात राहून विकासाला मोठा हातभार लावला. प्रत्येक महिलेचे प्रबोधन करून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. सांडपाणी व्यवस्थापनासाठी अनेक प्रयोग यशस्वी करून दाखवले. निर्मलग्राम पुरस्कार मिळण्यात विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे.

सुनीता ढगे, सरपंच, बेळगाव ढगा

## श्रमसंस्कार रुजले

विद्यार्थ्यांत शिक्षणाबरोबरच श्रमदानाचे संस्कार रुजावेत यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आले. बेळगाव ढगा येथे स्वच्छ भारत अभियानांतर्गत आरोग्याचे महत्त्व पटवले. लोकसहभागातून या विविध विकासकामे करण्यासाठी मदत केली. सामाजिक बांधिलकीचीही जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.

डॉ. एस. टी. गंधे, प्राचार्य, अभियांत्रिकी महाविद्यालय, संदीप फाउंडेशन

|| ग्रामविकास हेचि आमुचे ध्येय ||

# ग्रामपंचायत बेलगांवढगा

ता. जि. नाशिक.

स्थापना २१/४/१९६८

जा.क्र.ग्रापबे..................../२०१

दिनांक - ०२/१०/२०१५

## प्रमाणपत्र

सरपंच ग्रामपंचायत बेलगांव ढगा ता.जि.नाशिक यांचे कडून प्रमाणपत्र देण्यात येते कि

संदीप इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च सेंटर नाशिक. मधील एन एस एस च्या विद्यार्थ्यांनी ०२ ऑक्टोबर २०१५ रोजी ग्रामपंचायत बेलगांव ढगा ता.जि.नाशिक येथे स्वच्छता अभियान राबविले बद्दल त्यांना हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सरपंच

ग्रामपंचायत बेळगांवढगा

ता. जि. नाशिक